## <u>रे.मु.नं.२४५/१९८७ मधील निशाणी क्र.३११ वरील आदेश</u>

वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० (२) प्रमाणे प्रतिवादी क्र.११ व १२ यांची नावे वगळण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. वादीचे अर्जात असे कथन आहे की, वादी यांनी वाटपासाठी दावा दाखल केलेला आहे. वादी व प्रतिवादी हे एकत्र हिंदु कुटूंबातील आहेत. दाव्यामध्ये अंजुबाई रावसाहेब देशमुख या वादी होत्या. दावा दाखल करतेवेळी वादी क्र.१ राजाबाई घोरपडे व वादी क्र.२ कुसुम घोरपडे यांची नावे आवश्यक पक्षकार म्हणून प्रतिवादी क्र.११ व १२ म्हणून समाविष्ट केलेली होती. अंजुबाई रावसाहेब देशमुख यांचे मृत्युपश्चात वादी क्र.१ राजाबाई घोरपडे व वादी क्र.२ कुसूम घोरपडे यांची नावे दाव्यामध्ये वादी यांचे वारस म्हणून समाविष्ट केलेली आहेत. सदर दुरुस्ती केली त्यावेळी राजाबाई घोरपडे व कुसूम घोरपडे या वादी झालेल्या असल्याने त्यांची प्रतिवादी म्हणून असलेली नावे वगळणे आवश्यक होते परंतू नजरचुकीने त्यांची प्रतिवादी म्हणून असलेली नावे वगळण्याचे राहून गेले आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.११ व १२ यांची नावे दाव्यातून वगळण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र.३-अ ते ३-ब, , १८, २३ व २४ यांनी वादीच्या प्रस्तुत अर्जास निशाणी ३१८ कडे म्हणणे सादर करुन वादीच्या अर्जास तिव्र हरकत नोंदविली आहे. या प्रतिवादींनी त्यांचे म्हणण्यात पुढे असे कथन केले आहे की, वादीचा अर्ज आदेश १ नियम १० (२) चे अधिकार क्षेत्रात येत नाही. वाटपाच्या दाव्यात प्रतिवादी त्यांना वादीत सामील करावे म्हणून अर्ज देवू शकतात परंतू वादीच सामील प्रतिवादींना वादी करावे म्हणून अर्ज देवू शकत नाहीत. आदेश १ नियम १० मधील मार्गदर्शक तत्वानुसार केवळ प्रतिवादीचा हक्क वादीचे हक्कात समाविष्ठ झाला म्हणून ते वादी होवू शकत नाहीत. याबाबतचा १९९६ (२) बीसीजे ५३८ वरील निवाडा दाखल केलेला आहे. सदरचा दावा दाखल होऊन ३५ वर्षे झालेली आहेत. वादी जाणीवपूर्वक प्रत्येकवेळी विसंगत व बेकायदेशीर अर्ज देऊन दाव्याचे कामकाज लांबवीत असल्याने प्रतिवादींना नाहक त्रास होत आहे. त्यामुळे अर्ज रद्द करण्याची विनंती केली आहे.

४. प्रतिवादी क्र.२ (१) ते २ (७), ५ ते ८, २० ते २२, २५ ते २८ यांनी प्रस्तुत अर्जास निशाणी ३११ कडे म्हणणे देऊन अर्जास तीव्र विरोध दर्शविला आहे. सदर प्रतिवादींचे म्हणणे असे आहे की, वादी अंजुबाई देशमुख हिने सदरचा तथाकथित वाटपाचा दावा सन १९८७

साली दाखल केलेला आहे. मूळ वादीने सदर दाव्यात प्रतिवादी क्र.११ व १२ यांना सामील केले आहे. त्यांना वारस म्हणून सामील केलेले नव्हते व नाही. तसेच यातील वादीच्या दाव्यात कोठेही प्लीडींग नाही. आता मात्र वादी त्यांना दाव्यात प्रतिवादी म्हणून सामील केले असताना वारस म्हणून कमी करण्याबाबतची मागणी केलेली आहे. वादीने मुळ दाव्यात त्यांचे हिश्याबाबत कोठेही प्लीडींग केलेली नाही. आता वादी म्हणून सामील करुन हिश्याची मागणी करीत आहे. तसेच सदरची दुरुस्ती मुदतीत नाही. त्यामुळे अर्ज रद्द करण्यातची विनंती केली आहे.

**५.** अर्ज व म्हणणे पाहिले. दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुतचा दावा वाटपासाठी दाखल केला आहे. पूर्वी वादी क्र.१ राजाबाई घोरपडे व वादी क्र.२ कुसूम घोरपडे हे या दाव्याकामी प्रतिवादी क्र.११ व १२ म्हणून समाविष्ट होते. परंतू, वादी अंजूबाई रावसाहेब देशमुख यांचे मृत्युनंतर अंजूबाई हिचे वारस म्हणून राजाबाई व कुसूम यांची नावे दाव्यात वादी म्हणून सामील केलेले आहे. अशा परिस्थितीत वादीने दिलेल्या अर्जाप्रमाणे सदरील राजाबाई व कुसूम हे प्रतिवादी क्र.११ व १२ यांना दाव्यातून कमी केलेस प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. तसेच सदरील प्रतिवादी क्र.११ व १२ हया या दाव्याकामी पूर्वी आवश्यक पक्षकार होते व ते आता वादी असल्याने वादी , प्रतिवादी यांचेतील वाद कायमस्वरुपी संपुष्ठात आणण्याकरीता मदत होणार आहे. प्रतिवादी यांनी त्यांची नावे कमी करण्यास हरकत घेतली असली तरी प्रतिवादींच्या कथनात तथ्य नाही. सदरील प्रतिवादी क्र.११ व १२ यांची नावे कमी केल्यास इतर प्रतिवादींना काहीही त्रासाचे होणार नाही. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीस अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र.११ व १२ यांची नावे कमी करणेस परवानगी देणेत येते.

३. वादीने सदरची दुरुस्ती करुन दुरुस्ती प्रत दाखल करावी.

माळशिरस ( जी. एम. नदाफ )

दि.२०.०४.२०२१ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माळशिरस

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this P.D.F. File order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S.S.Mitragotri |
| Name of the court | : | J.M. F.C. Malshiras. |
| Order signed on | : | 19.12.2020 |
| Judgment uploaded on | : | 19.12.2020 |